**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज नवी दिल्लीत नव्या संसद भवनात मतदान सुरू
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज पंजाब आणि हिमाचल प्रदेशातल्या पूरग्रस्त भागाच्या दौऱ्यावर
- नेपाळमधे समाज माध्यमांवरच्या बंदीविरोधात तरुणांच्या आंदोलनानंतर काठमांडूमधे बेमुदत संचारबंदी लागू / नेपाळच्या ४ मंत्र्यांचे राजीनामे

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून संयुक्त अरब अमिरातीत प्रारंभ

**<><><><><>**

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज नवी दिल्लीत नव्या संसद भवनात मतदान सुरू आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सगळ्यात आधी मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, जितेंद्र सिंह, प्रल्हाद जोशी, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, माजी प्रधानमंत्री एच डी देवेगौडा, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, समाजवादी पक्षाचे नेते रामगोपाल यादव, द्रमुक नेते दयानिधी मारन, जदयू खासदार संजय झा यांनी मतदान केलं. इतर सदस्यही मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर पोहोचले आहेत.

रालोआचे उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि इंडिया आघाडीचे उमेदवार सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत होत आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे मिळून ७८१ सदस्य या निवडणुकीत मतदान करतील. लोकसभेचे ५४२ आणि राज्यसभेचे २३९ सदस्य मिळून ७८१ सदस्य उपराष्ट्रपतीपदासाठी मतदान करणार आहेत. विजयासाठी ३९१ मतांची आवश्यकता आहे. दरम्यान, या निवडणुकीत मतदान न करायचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताचे सर्व उपग्रह पूर्णपणे कार्यरत होते, असं इस्त्रोचे अध्यक्ष व्ही नारायणन यांनी म्हटलं. नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. भारताची तंत्रज्ञानाची बाजू भक्कम करणं, तंत्रज्ञान हस्तांतर, तसंच अवकाश संशोधन क्षेत्रात देशाचं नेतृत्व जागतिक स्तरावर प्रस्थापित करण्यात इस्त्रो महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं ते म्हणाले.

स्वदेशी संरक्षण उत्पादन, निर्यात आणि नवोन्मेष याद्वारे संरक्षण दलं देशाच्या विकासात भर टाकत आहेत, असं लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी म्हणाले. इतर देशांच्या तंत्रज्ञानाशी सामना करण्यासाठी आपण सज्ज आहोत असं द्विवेदी म्हणाले.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच केलेल्या फेररचनेमुळे शेतीसाठी उपयुक्त अनेक वस्तूंवरच्या जीएसटी करात बदल झाला आहे. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड- व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

*शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असे अनेक बदल कररचनेत झाले आहेत. फक्त शेतात वापरले जाणारे ट्रॅक्टर्स, ट्रॅक्टरचे टायर्स आणि ट्यूब, ट्रॅक्टरला जोडल्या जाणाऱ्या ट्रॉलीचे टायर्स आणि ट्यूब यांच्यावरचा कर ५ टक्क्यांवर आला आहे. खत निर्मितीसाठी वापरले जाणारे काही पदार्थ, कीटकनाशकांचे घटक पदार्थ, कडुनिंबापासून तयार झालेली कीटकनाशकं, यांच्यावरचा जीएसटी १२ टक्क्यांवरुन उतरुन ५ टक्के झाला आहे.*

*मात्र तंबाखू सेवनाला प्रोत्साहन मिळू नये या दृष्टीनं पानमसाला, तंबाखूची इतर उत्पादनं , ई सिगरेटसारखी निकोटीन आधारित पण धूर न सोडणारी उत्पादनं यावरचा कर २८ टक्क्यांवरुन वाढवून ४० टक्के करण्यात आला आहे. याला अपवाद फक्त तेंदुपत्त्यापासून तयार होणाऱ्या विड्यांचा असून त्यावरचा कर १८ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे.*

नवीन कररचना येत्या २२ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेश आणि पंजाब राज्यातल्या पूर स्थितीचा तसंच मदत कार्यांचा सविस्तर आढावा घेण्याकरता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज या दोन्ही राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. आज दुपारी ते हिमाचल प्रदेशात धर्मशाला इथे राज्य सरकारी अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय आढावा बैठक घेतील तसंच आपद्ग्रस्त स्थानिकांशी संवाद साधतील. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलांच्या पथकांना भेटून मोदी हिमाचल प्रदेशातील भूस्खलनग्रस्त भागांचं हवाई सर्वेक्षण करतील.

हिमाचल प्रदेशानंतर, पंजाबच्या पूरग्रस्त भागांचीही प्रधानमंत्री हवाई पाहणी करतील. तिथल्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन पूरग्रस्त नागरिकांशी ते संवाद साधणार आहेत.

**<><><><><>**

हिमाचल प्रदेशात संततधार पावसाने झालेल्या विविध दुर्घटनांमुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. कुलु जिल्ह्यात निरमंड गावात काल रात्री दरड कोसळल्यामुळे दोन घरं कोसळली. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला असून चार जण बेपत्ता झाले आहेत. त्यांचा शोध सुरू आहे. या दुर्घटनेत तीन जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

यंदा मान्सून काळात हिमाचल प्रदेशात १३६ ठिकाणी दरडी कोसळल्या, ९५ ठिकाणांवर पूर तर ४५ ठिकाणी ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत ३७० जणांचा मृत्यू झाला असून ४३४ जण जखमी झाले

आहेत, तर ४१ जण बेपत्ता झाले आहेत. राज्यात अद्यापही ३ राष्ट्रीय महामार्ग आणि ७४४ रस्ते वाहतुकीसाठी बंद आहेत. पाणी आणि वीजपुरवठा खंडित झाला आहे. या दुर्घटनांमुळे ४ हजार १२२ कोटी रुपयांची वित्तहानी झाली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात प्रयागराज, आग्रा आणि मथुरा जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती कायम आहे. यमुना नदीला आलेल्या पुराचा सर्वाधिक फटका मथुरा जिल्ह्याला बसला असून नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पाणी शिरलं आहे. पुरामुळे मथुरा जिल्ह्यातल्या शाळा आणि महाविद्यालयं बंद ठेवण्यात आली आहेत. मथुरा जिल्ह्यातून ५ हजार जणांना मदत शिबिरांमध्ये हलवण्यात आलं आहे. आग्रा जिल्ह्यातही यमुनेला आलेल्या पुराचं पाणी ताजमहालाच्या परिसरात शिरलं आहे. प्रयागराज जिल्ह्यात गंगा आणि यमुना नद्यांना आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**<><><><><>**

नेपाळमधे समाज माध्यमांवरच्या बंदीविरोधात तरुणांच्या आंदोलनावर गोळीबारानंतर आज काठमांडू, पोखरा, इटहरी यासह अनेक शहरात अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू करण्यात आली आहे. काल मोर्चावर केलेल्या गोळीबारात १९ जणांचा मृत्यू झाला, तर ३४० पेक्षा जास्त जण जखमी झाले, याची जबाबदारी घेत नेपाळचे गृहमंत्री रमेश लेखक यांनी राजीनामा दिला. गोळीबाराच्या घटनेमुळे लेखक यांच्यावर चोहोबाजूंनी टीका झाली, सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडूनही त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. रमेश लेखक यांच्यासह आरोग्य मंत्री प्रदीप पौडेल, कृषी मंत्री रामनाथ अधिकारी, पाणीपुरवठा मंत्री प्रदीप यादव यांनीही राजीनामे दिले आहेत.

या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल, असं आश्वासन प्रधानमंत्री के पी शर्मा ओली यांनी दिलं आहे. मृतांच्या कुटुंबांना मदत तसंच जखमींवर मोफत उपचार केले जातील असं त्यांनी सांगितलं.

नेपाळमधे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तिथे राहणाऱ्या **भारतीय** नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याचं आणि नेपाळच्या प्रशासनानं दिलेल्या मार्गदर्शक सूचना पाळण्याचं आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं केलं आहे. आंदोलनावर झालेल्या गोळीबारात तरुणांना जीव गमवावा लागणं दुःखद असून भारत सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**संयुक्त** राष्ट्रांनीही नेपाळमधल्या घटनेबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. प्रशासनानं जनतेचं अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलनाचा आदर करणं आवश्यक आहे, असं संयुक्त राष्ट्राचे प्रवक्ता स्टिफन दुजारिक म्हणाले. सरकारने आंदोलकांशी संवाद साधून शांततेच्या मार्गानं तोडगा काढावा, असं आवाहन त्यांनी नेपाळला केलं.

**<><><><><>**

मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम आणि त्यांच्या पत्नी वीणा रामगुलाम यांचं आज आठ दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत आगमन झालं. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी त्यांचं स्वागत केलं. रामगुलाम यांनी यापूर्वी मे २०१४ मध्ये भारताला भेट दिली होती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी समारंभाला ते पाहुणे म्हणून उपस्थित होते. या दौऱ्यात, ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. दोन्ही देशातील धोरणात्मक सहकार्य आणखी मजबूत करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशीही ते चर्चा करतील. डॉ. रामगुलाम नवी दिल्ली बरोबरच वाराणसी, अयोध्या आणि तिरुपतीलाही भेट देणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा आजपासून संयुक्त अरब अमिरातीत सुरू होत असून अबूधाबी इथं होणाऱ्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात लढत होईल. भारताचा पहिला सामना उद्या दुबईत युएईच्या संघाशी तर येत्या १४ तारखेला पाकिस्तान बरोबर होणार आहे. येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

हाँग काँग २०२५ च्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धा आजपासून सुरु होत आहेत. ऑलम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधू भारताच्या वतीनं पहिला सामना डेन्मार्कच्या लाईन क्रिस्टोफर बरोबर खेळणार आहे. भारताच्या एच.एस.प्रणोय आणि आयुष शेट्टीसह पुरुष एकेरी विभागात लक्ष्य सेन सहभागी होणार आहे. पुरुष दुहेरीमध्ये सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांचीही निवड करण्यात आली आहे.

**<><><><><>**

ताजिकिस्तानमध्ये सुरू असलेल्या CAFA अर्थात मध्य आशियाई फुटबॉल संघटनेच्या फुटबॉल स्पर्धेत भारताने काल ओमानचा पराभव करून कांस्यपदक जिंकलं. भारताकडून उदांता सिंगने बरोबरी साधल्यानंतर निर्धारित वेळेत सामना १-१ असा संपला. ओमानने पेनल्टी शूटआउटमध्ये पहिल्या दोन संधी गमावल्या आणि गुरप्रीत सिंग संधूने शेवटचा पेनल्टी गोल वाचवून भारताला ३-२ असा विजय मिळवून दिला. आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यात भारताने ओमानचा पराभव करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

//<><><><><>//